# मेट्रो ३ चे दोन डबे लवकरच मुंबईत

## ऑगस्टमध्ये आठही डबे दाखल होण्याची शक्यता

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** मेट्रो ३ (कुलाबा-वांद्रे-सीप्झ) मार्गिकेसाठीच्या पहिल्या मेट्रो गाडीच्या आठ डब्यांपैकी दोन डबे आंध्र प्रदेशातील श्रीसिटी येथून मुंबईच्या दिशेने पाठवण्याची तयारी पूर्ण झाली आहे. ते ट्रेलर्सद्वारे सोमवारी श्रीसिटीतून पाठवण्याची शक्यता आहे. त्यानंतर उर्वरित सहा डबेही श्रीसिटीतून मुंबईत पाठवण्यात येणार असून ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात ते मुंबईत दाखल होण्याची शक्यता आहे.

**मरोळ-मरोशी येथे डब्यांची जोडणी...**
मेट्रो ३ मार्गिकेचे आठही डबे मरोळ-मरोशी येथे दाखल झाल्यानंतर त्यांची जोडणी केली जाईल. त्यानंतर पुढील प्रक्रिया पार करत मेट्रो ३ ची चाचणी घेतली जाईल.

मेट्रो ३ साठीच्या ३१ गाड्यांपैकी पहिली गाडी तयार आहे. मात्र मरोळ-मरोशी येथील तात्पुरत्या कारशेडचे काम अपूर्ण असल्याने ती मुंबईत आणण्यास विलंब होत असल्याचे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनमार्फत (एमएमआरसी) सांगितले ते. महत्त्वाचे म्हणजे ही गाडी येत नसल्याने मेट्रो ३ ची चाचणी सात महिन्यांपासून रखडली. आता एमएमआरसीच्या व्यवस्थापकीय संचालक पदाची धुरा अश्विनी भिडे यांच्याकडे आल्यानंतर त्यांनी मात्र प्रकल्पातील रखडलेली कामे मार्गी लावण्यास सुरुवात केली आहे. त्यानुसार श्रीसिटी येथील प्रकल्पात पडून असलेली गाडी अखेर आता मुंबईत आणण्यात येत आहे.

आठ डब्यांच्या पहिल्या गाडीचे दोन डबे रविवारी ट्रेलर्सवर ठेवण्यात आले असल्याची माहिती एमएमआरसीने दिली.